सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २३२ ठ. क्र. २३९
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सर्व्हे नंबर १७/१ब/१ सलगरवाडी येथे ड्रेनेज लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्र क्र. ०१/२०१६-१७ र.रु. १७,२१,५८२/- इतकेचे तयार केले असून, त्यास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३०-८-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. २४८ ठ. क्र. २४०
दि. १०/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. यल्लप्पा अंबाजी ताटीपामूल, क.श्रे.लि. यांना लाचलुचपत प्रकरणी रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल असून मे. न्यायालयात लाच लुचपत विभागाकडून चार्जशीट दाखल करण्यांत आली असून प्रस्तावात याबाबत सविस्तर माहिती असून श्री. ताटीपामूल यांचे विरोधातील केस न्यायप्रविष्ठ आहे. श्री. ताटीपामूल यांना खातेनिहाय चौकशीअंती बडतर्फ करण्यात आलेले असून याबाबत अपिल प्राधिकारी या नात्याने मा. स्थायी समितीने त्यांचे बडतर्फीचे आदेश रद्द करुन त्यांना त्यांच्या देय रक्कमा आदा करण्याबाबत निर्णय घेतलेला होता. सदरचा ठराव विखंडीतसाठी मा. शासनाकडे पाठविला असता मा. शासनाने मा. स्थायी समितीचा ठराव विखंडीत करुन एक महिन्याच्या आत महानगरपालिकेचे अभिवेदन पाठविणेबाबत कळविले आहे. मा. शासनाने निलंबीत केलेला मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ५०० दि. १९-१२-२०१४ हा महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवून त्यावर त्यांचे अभिवेदन मागणी केली असून त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १५-१०-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

श्री. अंबाजी यल्लप्पा ताटीपामूल यांचेविरुध्द लाचलुचपत प्रकरणी मे. न्यायालयात केस चालू असून न्यायप्रविष्ठ आहे असे असताना खातेनिहाय चौकशीच्या आधारे त्यांना बडतर्फ करणे चुकीचे व अन्यायकारक आहे. त्यामुळे मा. स्थायी समितीने ठराव क्र. ५०० दि. १९-१२-२०१४ ने अपील प्राधिकरण या नात्याने बडतर्फ आदेश रद्द करणेबाबत घेतलेला निर्णय योग्य आहे. श्री. ताटीपामूल यांची महानगरपालिकेमध्ये ३३ वर्षाची सेवा झालेली असून त्यांना सेवानिवृत्तीच्या तारखेस केस न्यायप्रविष्ठ असताना केलेली बडतर्फीची शास्ती त्यांच्यावर अन्यायकारक आहे.

त्यामुळे श्री. यल्लप्पा अंबाजी ताटीपामूल-कनिष्ठ श्रेणी लिपीक यांना केलेली दि. २९-९-२०१४ रोजीच्या आदेशान्वये केलेल्या शास्तीचे (बडतर्फीचे व निलंबन कालावधी निलंबन ग्राहय धरण्याचे) आदेश रद्द करण्यात येवून त्यांना नियमानुसार दि. ३०-९-२०१४ रोजी सेवानिवृत्त ग्राहय धरुन मे. न्यायालयातील प्रलंबित केसच्या निर्णयास अधिन राहून त्यांना सेवानिवृत्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नुसार तात्पुरते निवृत्ती वेतन देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच ठराव क्र. ५००, दि. १९-१२-२०१४ मा. स्थायी समिती अपील प्राधिकारी म्हणून जे निर्णय दिलेला आहे ते निर्णय योग्य आहे व तो निर्णय कायम करण्यात येत असून ठरावा प्रमाणे अंमलबजावणी करणेस व त्यानुसार मा. शासनाकडे कळविण्यास मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २४९ ठ. क्र. २४९ दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आर.सी.एच. कार्यक्रमांतर्गत नागरी आरोग्य सेवा केंद्राकडील कर्मचा-यांना सो.म.न.पा. आस्थापनेवर सामावून घेणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून मा.मनपा ठराव क्र. ८४, दि. ९-८-२०११ ने पारित झालेला ठराव पाहता, सदरचा ठराव हा नव्याने पदनिर्मितीस व शासन मान्यतेनंतर सामावून घेणेबाबत निर्णय झालेला आहे. तथापि यास मान्यता मिळालेली नाही. सध्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर १) स्त्री वैद्यकीय अधिकारी २) पी.एच.एन. ३) ए.एन.एम. ४) शिपाई कम सुरक्षारक्षक ही पदे मंजूर असून आजला रिक्त आहेत. त्यामुळे सदर कार्यरत २७ सेवकांना रिक्त पदावर नियुक्ती द्यावयाची झाल्यास याबाबत मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय होणे व सदर रिक्त पदे भरणेबाबत ३५ % आस्थापना खर्चाची अट शिथील होणेबाबत शासनाची मान्यता आवश्यक आहे. मा.मनपा निर्णय व शासन मान्यतेअंती सदर सेवकांना रिक्त पदावर अनुशेषानुसार समाविष्ठ करुन घेता येईल. तसेच आर.सी.एच. विभागाकडील केंद्रे कार्यान्वीत असलेने सदर विभागाकडे सेवकांची नियुक्ती करावी लागणार आहे. त्यामुळे यापूर्वी मा. शासनाकडे आर.सी.एच. कडील विविध संवर्गातील १०२ पदाच्या पद निर्मितीस प्रस्ताव पाठविण्यात आलेला असून, त्यास अद्यापही मान्यता मिळालेली नाही. शासनाने प्रस्तावात नमूद चार महानगरपालिकेंना पद निर्मितीस मान्यता दिलेली आहे. शहर हद्दीमध्ये एकूण सहा सेंटरमध्ये मा. शासन आराखडानुसार सोलापूर महानगरपालिकेस एकूण १०२ पदे निश्चित असून व सध्या ही योजना महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असल्याने आजला जरी सेवक कमी असली तरी निश्चित संख्यानुसार कामकाजाच्या दृष्टीने पदे भरणे आवश्यक असल्याने याबाबत ज्या पध्दतीने प्रकरणी नमूद चार महानगरपालिकेंना शासनाने पद निर्मितीस मान्यता दिलेली आहे त्या धर्तीवरच आर.सी.एच.कडील १) स्त्री वैद्यकीय अधिकारी-६ २) पी एच एन-६ ३) ए एन एम-१८ ४) क्लार्क-६ ५) शिपाई कम सुरक्षा रक्षक-६ व ६) लिंकवर्कर-६० अशा एकूण १०२ पद निर्मितीस मा. शासनाची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) नुसार मान्यता मिळणेसंदर्भात व सदरची पदेही बिंदूनामावलीनुसार भरण्याबाबत शासनाकडे फेर प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेअंती पाठविणे योग्य राहील. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे कार्यवाही ठेवणे संदर्भात प्रस्तावाचे अवलोकन होऊन याबाबत मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय आवश्यक असल्याने या संदर्भात सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १७-१०-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

म.न.पा.कडे असे आणखी किती सेवक कार्यरत आहेत या संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 234 ठ. क्र. 282
दि. 10/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ४ येथील जोडभावी पेठ येथे चिराग भवन समोरील चौकास **चिराग अली चौक** असे नामकरण करण्यांस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 236 ठ. क्र. 283
दि. 10/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



डी.एड. कॉलेज, नदाफ पोलीस कॉन्स्टेबलच्या बंगल्या जवळ असलेल्या रस्त्याला **कै. महिबूबसाब विजापूरे** असे नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २३६ ठ. क्र. २८८
दि. १०/१२/२०१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



फारशी बंगला पथ येथील पोलीस चौकी रामवाडी येथे रस्ता असून या रस्त्यास **कै. हबीबसाब सय्यद** असे नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२३८ ठ. क्र.२८५
दि.१०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी भुईकोट किल्ला आहे. किल्ला उभारताना बुरुज ढासळत होते. म्हणून ज्योतिष्याच्या सांगण्यावरुन गरोदर असताना एका स्त्रिने आत्मसमर्पण केले.म्हणुन सोलापूरचा भूईकोट किल्ला उभा राहिला. सोलापूर शहर ऐतिहासिक बनले. त्या घराण्याचे लोक मार्च आणि एप्रिल अखेर तिथीप्रमाणे चैत्रशुध्द प्रतिपदा गुढीपाडवा या शुभदिवशी त्यांचा स्मृतीदिन व बाळंतीण विहिरीची महापूजा व धार्मिक कार्यक्रम वंशपरंपरागत चालत आलेला आहे. त्या कार्यक्रमास मान्यवर नेतेमंडळी व भाविक, महिला व पुरुष हजारोच्या संख्येने उपस्थित असतात व त्या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते महाप्रसाद वाटप केला जातो.

तरी मार्च आणि एप्रिल उन्हाळा असल्यामुळे लहान मुले व भाविकांना उन्हाळयाचा भयंकर त्रास सहन करावा लागतो. तरी त्याठिकाणी पद्मावती टॉवरवर ५० बाय ५० कैंची मंडप,लाईट, स्पिकर ,सतरंजी नग-६, खुर्ची नग-५०, तसेच भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व पद्मावती टॉवर ते बाळंतीण विहिर ते जुने गेट पर्यंतचा रोड स्वच्छ करणे, टॉवर धुवून घेणे व आरोग्याच्या दृष्टीने डी.डी.टी.ची फवारणी करणे आदी कामांसाठी प्रतिवर्षी कायमस्वरुपी दोन दिवस अगोदर कार्यक्रमाच्या ठिकाणी व्यवस्था करणे व इतर कामे करणे. सदर कार्यक्रमासाठी येणारा खर्च हा सांस्कृतिक कार्यक्रम वि.क्र. एक या बजेट सदरी खर्ची टाकणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकुब/प्रामलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 23९ ठ. क्र. 28६
दि. 10/12/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरात विविध ठिकाणी गोरगरिब खोकेधारक किरकोळ व्यवसाय करुन आपल्या कुटूंबाची उपजिविका करीत आहेत. सोलापूर शहरातील अनेक गिरण्या व त्या अनुषंगीक व्यवसाय बंद पडले त्यामुळे हजारो लोक बेकार झाले. सध्या युवकांना नौकरी मिळणे अत्यंत कठीण झालेले आहे. अशाच प्रकारची परिस्थिती केवळ सोलापूरातच नव्हे तर देशभरात सर्वच राज्यात आहे. यासाठी ठोस उपाय योजना व्हावी व गोरगरिब खोकेधारक व किरकोळ विक्रेत्यांना व्यवस्थीत विना त्रास आपला व्यवसाय करता यावा म्हणून केंद्र सरकारने २०१४ मध्ये किरकोळ विक्रेत्यांच्या उदरनिर्वाह संदर्भात कायदा करुन त्यांना संरक्षण देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे. सदरहू कायद्याप्रमाणे महानगरपालिका ही सक्षम प्राधिकरण असून रस्त्यावरील किरकोळ विक्रेत्यांसाठी एक कमिटी स्थापन करुन त्याचा सर्व्हे करुन त्यांना विक्रीची प्रमाणपत्रे द्यावयाची आहेत. तसेच ज्या ज्या ठिकाणी हे किरकोळ विक्रेते व्यवसाय करतात त्या ठिकाणची पाहणी करुन समितीच्या शिफारसीप्रमाणे हॉकर्स झोन तयार करुन त्या संदर्भात त्यांची फी व त्यांना देण्यात येणा-या सवलती इत्यादी बाबी ठरविण्याचे आहेत. तसेच अशा प्रकारे व्यवसाय करणारे या गरिब किरकोळ विक्रेत्यांना त्रास होणार नाही याबाबत तरतुदी केलेल्या आहेत. सबब केंद्र सरकारच्या वर नमूद कायद्दयातील तरतुदीस अनुसरुन महानगरपालिकेने जी कार्यवाही करावयाची आहे ती तातडीने करणेस व जो पर्यंत या कायद्याप्रमाणे कार्यवाही होत नाही तो पर्यंत अशा किरकोळ गाडीवाले/व्यवसायीक यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करु नये यास ही सभा मान्यता देत आहे.

यापूर्वी म.न.पा.ने हॉकर्स झोन करिता जागा निश्चित केलेल्या आहेत व काही खोकेधारक व गाडीधारकांना बॅचेस दिलेले आहेत. अशा किरकोळ विक्रेत्यांच्या उदरनिर्वाहासाठी शहरामध्ये आणखी काही जागा सर्व्हे करुन हॉकर्स झोन म्हणून निश्चित करणे त्यांना प्रमाणपत्र देणे लायसन्स फी ठरविणे व तद्अनुषंगिक बाबीची पूर्तता करणेसाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करणेस मान्यता देणेत येत असून, सदरहू समिती एक महिन्यात आपला सविस्तर अहवाल सर्वसाधारण सभेकडे सादर करावा. दरम्यानच्या काळामध्ये या कायद्यांतर्गत किरकोळ गाडीवाले/व्यावसायिक यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये यांस ही सभा मान्यता देत आहे.

१) मा.महापौर
२) मा.उपमहापौर
३) मा.सभागृह नेता - कन्वेनर
४) मा. विरोधी पक्ष नेता
५) मा. अध्यक्ष स्थायी समिती
६) मा.उमरखान नबीखान बेरिया
७) मा.पांडुरंग सिद्रामाप्पा दिडड़ी
८) मा.भिमाशंकर बाबुराव म्हेत्रे
९) मा.पद्माकर केशव काळे
१०) मा.आनंद बाबूराव चंदनशिवे
११) मा.मौलाली बाशुमिया सय्यद

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २५१ ठ. क्र. २८६
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२५१

श्री. सुनिल रत्न जाधव वय-३५ (रा.रत्नदिप सोसायटी सोलापूर) या व्यक्तीचे एप्रिल २०१६ रोजी आकस्मित निधन झालेला आहे. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती खुप हालाखीचे आहे. त्यांचे कुटुंबात दोन मुली व पत्नी असे त्यांची कुटुंब आहे. त्यांचे कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी हे कर्ता म्हणून यांच्यावर होता. त्यांचे निधनाने कुटुंबाचे परिस्थित खुप हालाकीचे झालेली आहे. त्यांचे कुटुंबाचे उदारनिर्वाह होण्यासाठी आपल्या सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत-जास्त आर्थिक मदत मिळण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २५२ ठ. क्र. २४८
दि. १०/१२/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. शाहजान पठाण, वय-४५ (रा.शानदार चौक, सोलापूर) या व्यक्तीचे ऑगस्ट २०१६ रोजी शॉकसर्किट ने निधन झालेला आहे. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती खुप हालाखीचे आहे. त्यांचे कुटुंबात तीन मुले व पत्नी असे त्यांची कुटुंब आहे. त्यांचे कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी हे कर्ता म्हणून यांच्यावर होता. त्यांचे निधनाने कुटुंबाचे परिस्थित खुप हालाकीचे झालेली आहे. त्यांचे कुटुंबाचे उदारनिर्वाह होण्यासाठी आपल्या सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत-जास्त आर्थिक मदत मिळण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका